जा.क्र.कृतंविरो/ता.२/ ३० /२०२०
कृषि तंत्र विद्यालय, रोहा जि. रायगड
दिनांक : 10 JAN 2020

प्रति,

...................................

विषय : **कृषि तंत्र विद्यालय, किल्ला' रोहा येथे ठेका पध्दतीने फळबाग व हंगामी/भाजीपाला पिकातील कामे अकुशल मजूरांकडून करण्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबत......**

कृषि तंत्र विद्यालय, रोहा जि. रायगड येथील प्रक्षेत्रावरील **फळबाग व हंगामी/भाजीपाला पिकातील दि. ०१/०२/२०२० ते ३०/०३/२०२० कालावधीतील खालील कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी** दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक स्थानिक ठेकेदारांनी निम्नस्वाक्षरीदारांकडून कामाचे स्वरूप समजावून घेवून आपले दरपत्रक सिलबंद लखोटयामधून पोस्टाने किंवा प्रत्यक्ष कार्यालयास दिनांक २८/०१/२०२० पर्यंत या कार्यालयास पोहचतील असे पाठवावेत. लखोटयावर **"ठेका पध्दतीने फळबाग व हंगामी/भाजीपाला पिकातील कामे करण्यासाठी दरपत्रक"** असे स्पष्ट नमूद करावे दरपत्रक खालील नमुन्यात पाठवावे

| अ. क्र. | तपशिल | आवश्यक मजूर युनिट प्रति दिवस |
|---|---|---|
| १) | **फळबाग :–** फळझाडांना पाणी देणे, खते देणे, बुरशी नाशक व किटकनाशक यांची फवारणी करणे, पिकलेल्या फळांची काढणी करणे, फळबागेतील तण काढणे इ. | ०१ |
| २) | **भाजीपाला/हंगामी व व्यापारी तत्वावरील पिके:–** पिकांना पाणी देणे, तण काढणे. खते देणे, बुरशी नाशक व किटकनाशक यांची फवारणी करणे, कडधांन्य पिकांची/भाजीपाल्याची काढणी व विक्री करणे तसेच अनुषंगिक) आयत्या वेळी येणारी आवश्यक कामे करणे इ. | |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती**

१) बाबनिहाय कामे ठेका पध्दतीने करावयाची असल्याने ती कालबध्द आहेत त्यामुळे ती ठरवून दिलेल्या वेळेतच पुर्ण होणे आवश्यक आहे. **(वेळ सकाळी ०८ ते १२ दुपारी २ते ५.४५)**
२) दरपत्रकात प्रति मजूर प्रती दिवस मजूरीचा दर नमूद करावा.
३) ठेका कामासंबंधीच्या अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयास सार्वजनिक सुट्टया वगळून संपर्क साधावा. (वेळ स. ०८ ते १२ दु. २ ते ५.४५)
४) विहित मुदतीत दरपत्रके प्राप्त न झाल्यास त्या दरत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.
५) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहे.

**प्राचार्य**
**कृषि तंत्र विद्यालय, किल्ला**
**ता. रोहा जि. रायगड**

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :–**

१. मा.संचालक विस्तार, शिक्षण डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली, यांना विनंती करण्यात येते की, वरिल निविदा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करून मिळावी.
२. मा. सहयोगी अधिष्ठाता, काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था,किल्ला-रोहा, जि. रायगड
(कार्यालय नोटीस बोर्ड)